गोपनीय

शासकीय जमिनीवरील अतिक्रमणे
दूर करण्याबाबत

महाराष्ट्र शासन

महसूल व वन विभाग,
परिपत्रक
क्रमांक: एलइएन१०८२/३३५७२/सीआर१९४६-ग-३,

मंत्रालय, मुंबई-३२.

दिनांक: ४ ऑक्टोबर, १९८२.

पहा:- १) शासन परिपत्रक महसूल व वन विभाग क्र. एलईएन २६७८ / सीआर ७८२/२९११५/ग-१ दिनांक ३/१२/१९७९.

२) शासन परिपत्रक महसूल व वन विभाग क्र. एलईएन १०८२/६६०१/ग-३, दिनांक १७/२/१९८२.

परिपत्रक

दिनांक १६ व १७ जून १९८२ रोजी जुने विधान भवन, मुंबई येथे जिल्हाधिकारी व आयुक्तांचे परिषदेमध्ये भाषण करतांना माननीय मुख्य मंत्री महोदयांनी शासकीय जमिनीवर होणा-या अतिक्रमणाबद्दल तीव्र चिंता व्यक्त केली आहे.

शहरी विभागात अकृषिक कारणासाठी तर ग्रामिण विभागात गायरान जमिनीवर कृषिक कारणासाठी फार मोठ्या प्रमाणात अतिक्रमणे होतात ही गोष्ट स्पष्ट करुन ते म्हणाले की, अशा प्रकारची शासकीय जमिनीवरील अतिक्रमणे खंबीरपणे दूर करायला हवीत.

विशेषतः शहर भागात शासकीय इमारतीसाठी शासकीय कर्मचा-यांच्या निवासस्थानासाठी व सामाजिक उपयोग इत्यादीसाठी राखून ठेवलेल्या जमिनीवर सुध्दा अतिक्रमणे होतात. ती वेळीच दूर झाली तर अतिक्रमणाचा हा प्रश्न विकोपास जाणार नाही असेही मुख्यमंत्री महोदय म्हणाले.

या संदर्भात सर्व जिल्हाधिकारी यांना विनंती करण्यात येते की, त्यांनी संबंधीत सर्व महसूल अधिकारी व कर्मचा-यांना आदेश द्यावेत की त्यांनी शासकीय जमिनीवर अतिक्रमणे होऊ देऊ नयेत व याची पुरेपूर दक्षता घ्यावी तरीही अतिक्रमण झाल्यास त्या बाबत तत्काळ वरिष्ठ अधिका-यांना कळवून सदर अतिक्रमणे वेळीच दूर करण्यासाठी पाऊल उचलावे म्हणजे अतिक्रमणे/प्रकरणे विकोपास जात नाहीत. अतिक्रमणे सहसा नियमित करु नयेत परंतु, एखाद दुस-या गुणवत्ता प्रकरणामध्ये अतिक्रमण नियमित करावयाचे झाल्यास ते अतिक्रमण करणा-यांना किफायतशीर ठरु नये असे पहावे म्हणजे अतिक्रमण प्रवृत्तीला आळा बसू शकेल. जुनी अतिक्रमण प्रकरणे लवकर निकालात काढावीत व अतिक्रमण प्रकरणातील महसूल थकबाकी त्वरित वसूल करावी. सहकाराच्या नावाखाली संघटीत अतिक्रमणे धार्मिक नावाखाली अतिक्रमण करुन त्या परिसरात राहती घरे बांधून अतिक्रमण करणा-या व शहरी भागात शासकीय जमिनीवर धंदेवाईक अतिक्रमण करुन घरे बांधून भाड्याने अथवा विकत देणा-या समाज कंटकांच्या कारवायांना वेळीच पायबंद घालावा व मौल्यवान शासकीय जमिनीचे संरक्षण

करण्यासाठी जरूर ते सर्व उपाय योजून ती अतिक्रमणापासून वाचवावी.

शासनाच्या निरनिराळ्या विभागाच्या ताब्यातील शासकीय जमिनीवर अतिक्रमण होणार नाही याची त्या त्या संबंधीत विभागाने दक्षता घ्यावी व तरीही अतिक्रमण झालेच तर महसूल विभाग व पोलीसांची मदत घेवून त्यांनी सदर अतिक्रमण वेळीच दूर करावे.

शासकीय जमिनीवर अतिक्रमण करणा-या व्यक्तिशी संगनमत करुन अतिक्रमण चालू ठेवण्यास संधी देणा-या महसूल कर्मचा-यांना/अधिका-यांना योग्य ते शासन करावे व ज्या संबंधि महसूल कर्मचा-यांच्या/अधिका-यांच्या क्षेत्रात अतिक्रमण होत असून देखिल त्यांनी त्याबाबत काहीएक आवश्यक ती कार्यवाही केली नाही आणि / अथवा वरिष्ठ अधिका-यांस त्याबाबत वेळीच कळविले नाही तर त्यांचे गोपनीय अहवालामध्ये त्यांच्या या कृत्याची जरुर नोंद घेण्यात यावी व दक्षतारोध आणि बढतीचे वेळी हे अहवाल अवश्य लक्षात घ्यावेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नांवाने,

सी. डी. सिंग 7/10/82

( सी. डी. सिंग )
सह सचिव, महाराष्ट्र शासन,
महसूल व वन विभाग.

प्रति,